CON 1019

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## वन अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा

मुंबई, शनिवार, दिनांक १९ जानेवारी २०१९

[ **वेळ** : सकाळी १०-०० ते दुपारी १-०० ]

(**एकूण गुण**-१५०)

**पेपर क्रमांक १**

**लॅन्ड रेव्हेन्यू व क्रिमिनल लॉ वगैरे**

(पुस्तकांसह)

**सूचना**.—(१) उत्तरपत्रिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

(२) उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडविल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

(३) प्रश्नांची उत्तरे **मराठी** वा **इंग्रजी** यापैकी एकाच भाषेत लिहावयाची आहेत.

(४) प्रश्न क्रमांक **एक** सोडविणे अनिवार्य आहे. उर्वरीत **७ (सात)** प्रश्नांपैकी कोणतेही **६ (सहा)** प्रश्न सोडवा.

**गुण**

१. टिपा लिहा (कोणत्याही **पाच**) :— ३०

(अ) शाबितीची जबाबदारी.

(ब) एखादा हक्क किंवा रूढी ठरविण्याकरिता संबद्ध तथ्ये.

(क) संक्षिप्त संपरीक्षा करण्याचा दंडाधिकाऱ्याचा अधिकार.

(ड) सत्र न्यायालय.

(इ) लोकसेवक.

(फ) गैरनिरोध व गैरपरिरोध.

२. जिल्ह्यातील महसूल अधिकारी आणि त्यांचे अधिकार व कर्तव्ये स्पष्ट करा. २०

३. इतरांच्या मालमत्ता नसलेल्या सर्व जमिनी, सार्वजनिक रस्ते इत्यादिवरील राज्याच्या मालकी हक्काबाबतच्या तरतुदी स्पष्ट करा. २०

४. अधिकृत सीमा चिन्हे आणि भूमापन चिन्हे लिहा. तसेच सीमा चिन्हे सुव्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी निश्चित करणेबाबतचे नियम स्पष्ट करा. २०

५. आरोपीवरील अपराधाबाबतचे दोषारोपांचे प्रारुपात नमूद करावयाचा मजकूर व तपशिलाचे विवेचन करा. २०

६. स्वामित्त्व चिन्ह, त्याबाबतचे गुन्हे आणि शिक्षेबाबतच्या तरतुदी उदाहरणासह स्पष्ट करा. २०

७. लोकसेवक आरोपी होतात ती भारतीय दंड संहितेतील कलमे व त्यासाठी होणारी शिक्षा याबाबत उदाहरणासह विवेचन करा. २०

८. दंडाधिकाऱ्यापुढे कार्यवाही सुरु करणेबाबतच्या फौजदारी प्रक्रिया संहितेतील तरतुदी थोडक्यात स्पष्ट करा. २०

[ उलटून पहा

# MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## DEPARTMENTAL EXAMINATION FOR FOREST OFFICERS

MUMBAI, SATURDAY, 19TH JANUARY 2019

[Time—10-00 A.M. to 1-00 P.M.]

(Full Marks—150)

## PAPER I

## LAND REVENUE AND CRIMINAL LAW, ETC.

*(With Books)*

*N.B.*— (1) Candidate should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his / her identity anywhere inside the answer book otherwise he / she will be penalised.

(2) Candidates are expected to answer all the sub-questions of a question together, if sub-question of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later sub-question shall be overlooked.

(3) Answers are to be written in one language only either in *Marathi* or in *English*.

(4) Question number *one* is *compulsory*. Solve any 6 *(Six)* questions from the remaining 7 *(Seven)* Questions.

| | | Marks |
|---|---|---|
| 1. | Write short notes on (any *five*) :—<br>*(a)* Burden of Proof.<br>*(b)* Facts relevant when right or custom is in question.<br>*(c)* Power of Magistrate to try summarily.<br>*(d)* Court of session.<br>*(e)* Public Servant<br>*(f)* Wrongful restraint and wrongful confinement. | 30 |
| 2. | Explain in short, Revenue Officers in district and their powers and duties. | 20 |
| 3. | Explain the provisions about, title of state in all lands, public roads, etc., which are not property of others. | 20 |
| 4. | Write authorised boundry marks and survey marks. Also explain the rules of determination of responsibility for maintainance of boundry marks. | 20 |
| 5. | Explain contents and particulars of charge of offence on accused to be mentioned in form of charges. | 20 |
| 6. | Explain the provisions with examples, about property mark and offences and punishments about that. | 20 |
| 7 | Explain with examples sections in Indian Penal Code, about offences by public servants and punishments for the same. | 20 |
| 8. | Explain in short provisions in the code of criminal procedure, about commencement of proceedings before magistrates. | 20 |

CON 1020-1

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## वन अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा

मुंबई, शनिवार, दिनांक १९ जानेवारी २०१९

[ **वेळ** : दुपारी २-३० ते सायंकाळी ५-३० ]

(**एकूण गुण**–१५०)

**पेपर क्रमांक २**

**फॉरेस्ट लॉ - इंडियन फॉरेस्ट ॲक्ट वगैरे**

(पुस्तकांशिवाय)

**सूचना**.—(१) उत्तरपत्रिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

(२) उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडविल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

(३) प्रश्नांची उत्तरे **मराठी** वा **इंग्रजी** यापैकी एकाच भाषेत लिहावयाची आहेत.

(४) जेथे लागू असेल तेथे संबंधित अधिनियम, कलम व नियमाचा उल्लेख करावा.

(५) कोणतेही **पाच** प्रश्न सोडवा.

**गुण**

१. (अ) भारतीय वन अधिनियम, १९२७ यात 'वन-उत्पादन' या शब्दाची व्याख्या खालील दोन श्रेणीत करण्यात आलेली आहे. ०५

(१) वस्तू, त्या वनात सापडलेल्या असोत किंवा वनातून आणलेल्या असोत किंवा नसोत ; आणि

(२) वस्तू, त्या वनात सापडल्या असतील किंवा वनातून आणलेल्या असतील.

उक्तप्रमाणे नमूद केलेल्या प्रत्येक श्रेणीत कोणत्याही पाच वस्तू लिहा.

(ब) भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ३ मध्ये तरतूद आहे की, राज्य शासन हा काही क्षेत्रास राखीव वने म्हणून गठित करु शकेल. ०५

राज्य शासन ज्या अंतर्गत राखीव वने गठित करु शकेल, अशी परिस्थिती कोणती ?

(क) भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या प्रकरण दोन अंतर्गत चौकशीच्या प्रयोजनार्थ वन जमाबंदी अधिकारी हा कोणत्या शक्तींचा वापर करू शकतो ? ०४

(ड) भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम २० प्रमाणे राज्य शासनाद्वारे राखीव वने घोषित होण्यापूर्वी कोणत्या औपचारिकता पूर्ण होणे बंधनकारक आहेत ? ०५

(इ) महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ च्या संदर्भात खालील प्रश्नांची उत्तरे द्या—

(१) 'खाजगी वने' या शब्दाची व्याख्या लिहा. ०५

(२) कलम ३ अनुसार 'नेमलेल्या दिवसापासून' (with effect on and from the appointed day) खाजगी वनास कोणत्या तरतूदी लागू होतात ? ०३

(फ) भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ७२ अनुसार राज्य शासन वन अधिकाऱ्यास ज्या शक्ती निहित करु शकतो, ती शक्ती नमूद करा. ०३

[ उलटून पहा

गुण

२. (अ) भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम २६ अनुसार अपराध ठरत असणारी कोणतीही पाच कृत्ये नमूद करा. ०५

(ब) भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ५२ अनुसार कोणत्या परिस्थितीत वन उत्पादन हा इतर वस्तूंसह जप्त केला जाऊ शकतो ? जर अशी जप्ती अन्यायाने (Wrongful) केली असेल तर काय परिणाम होऊ शकतात ? ०७

(क) भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ५८ मधील तरतुदींनुसार कलम ५२ खाली जप्त केलेल्या वस्तू विकल्या जाऊ शकतात. या संदर्भात खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

(१) जप्त मालमत्ता कोण विकू शकतो ? ०२

(२) अशा मालमत्ता विकण्यापूर्वी कोणत्या अटींची पूर्तता होणे आवश्यक आहेत ? ०२

(३) ज्या अधिकाऱ्याने अशा मालमत्ता विकल्या आहेत, त्याची कर्तव्ये काय आहेत ? ०२

(ड) संबंधित कलमे नमूद करुन खालील प्रश्नांची उत्तरे द्या—

(१) भारतीय वन अधिनियम, १९२७ अनुसार अटक करु शकणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे लिहा. ०३

(२) कोणत्या परिस्थितीत सदर अटक केली जाऊ शकते ? ०२

(३) कलम ६५ खाली अटक झालेल्या व्यक्तीस कोण मुक्त करू शकतो ? कार्यपद्धती सुद्धा लिहावी. ०४

(इ) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या संदर्भात खालील प्रश्नांची उत्तरे द्या—

(१) सामान्य परिस्थितीत वन जमिनीचे वनेत्तर वापर करण्याकरिता वळती करण्यासाठी कोणाची पूर्व परवानगी आवश्यक असते ? ०१

(२) कलम २ मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्यास अशा स्थितीत कोणत्या शिक्षा विहित आहेत ? ०२

३. (अ) वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या संदर्भात खालील प्रश्नांची उत्तरे द्या —
खालील शब्दांमध्ये फरक स्पष्ट करणाऱ्या संक्षिप्त टिप्पणी लिहा.

(१) 'प्राणी' 'बंदिस्त प्राणी' आणि 'वन्य प्राणी' ०३

(२) 'अभयारण्य' 'राष्ट्रीय उद्यान' व 'संरक्षित क्षेत्र'. ०३

(३) 'शिकार' (hunting) हा शब्द स्पष्ट करा. ०३

(ब) एखाद्या ठिकाणी असलेल्या खालील परिस्थितीचे काळजीपूर्वक वाचन करा आणि वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतुदींनुसार प्रश्नांची उत्तरे द्या.

एका गावात मागील दोन-तीन महिन्यापासून ग्रामस्थांद्वारे शेतीखालील क्षेत्र व त्या भोवतीच्या परिसरात एक वाघ नियमितपणे पाहिला जातो. उक्त गावाचे कमीत कमी १०० कि.मी. त्रिज्येत कोणतेही संरक्षित क्षेत्र (Protected Area) नाही. ज्यात सदर गाव स्थित आहे, त्या तालुक्यात वने तुकड्यात विखुरलेली आहेत. सध्या ऑक्टोबर-नोव्हेंबर महिना चालू आहे आणि खरीप पिक कापणीसाठी तयार आहेत. आतापर्यंत सदर वाघाने उक्त गावातील ८-१० गुरे मारली आहेत. तथापि त्याने कोणत्याही इसमास मारले नाही किंवा त्यास हानी पोचविण्याचा प्रयत्न केला नाही. शेतकऱ्यांना पिकांची काळजी घेण्याकरिता त्यांच्या शेतात जाणे भाग पडते, कारण की सदर पिके विनाविलंब काढणे (harvest) आवश्यक आहे. परंतु वाघाच्या वावरामुळे त्यांना असुरक्षित वाटते, विशेषत: संध्याकाळनंतर आणि पहाटेच्या वेळी. सबब, सदर वाघाला ठार मारण्यात यावे, असे निवेदन घेऊन ते स्थानिक वन अधिकाऱ्यांकडे जातात. वन अधिकाऱ्यांनी गुरे मारल्या गेल्या ठिकाणी कॅमेरा ट्रॅप्स (Camera Traps) लावलेले आहेत आणि वाघाच्या उपस्थितीबाबत खात्री झालेली आहे. सदर वाघास ठार मारण्यासाठी गावकऱ्यांद्वारे आणि लोकप्रतिनिधींद्वारे वन अधिकाऱ्यांवर प्रचंड दबाव आहे.

(१) वाघास बंदिस्त किंवा ठार मारण्याकरिता आदेश जारी करण्यासाठी कोणत्या प्राधिकरणास शक्ती आहे ? ०१

(२) उक्त प्राधिकरणाद्वारे बंदिस्तीबाबत आदेश जारी होण्यापूर्वी कोणत्या अटी पूर्ण होणे क्रमप्राप्त आहेत ? ०३

गुण

(३) जर सदर प्राधिकरण वाघास ठार मारण्याचा निर्णय घेत असेल तर असा आदेश निर्गमित करण्यापूर्वी त्यास कोणत्या बाबींबद्दल स्वतःला संतुष्ट करावे लागेल ? ०१

(४) जर सदर प्राधिकरणाद्वारे वाघास बंदिस्त करण्याचा निर्णय घेण्यात आला तर त्यास कायमस्वरुपी बंदिस्त ठेवला जाऊ शकतो किंवा कसे ? दोन्ही परिस्थितीखालील आवश्यक परिस्थिती नमूद करा. ०२

(५) वाघास ठार मारण्यासाठी स्वतःला सक्षम प्राधिकरण गृहीत धरून आपल्या आदेशाचा अंमलबजावणी भाग **(Operative part)** लिहा. (फक्त अंमलबजावणी भाग लिहा. आदेशात स्वतःचे नाव लिहू नये). ०३

(क) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या संदर्भात खालील प्रश्नांची उत्तर द्यावे.—

व्याख्या लिहा.–

(१) वन जमीन ०१

(२) गौण वन उत्पादन ०१

(३) इतर पारंपरिक वन निवासी. ०१

(ड) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या कलम ३(१) खाली अनुज्ञेय असलेले कोणतेही पाच वन हक्क नमूद करा. ०५

(इ) महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रातील गौण वन उत्पादनाची मालकी हस्तांतरण करणे आणि महाराष्ट्र गौण वन उत्पादन (व्यापाराचे विनियम) (सुधारणा) अधिनियम, १९९७ अनुसार अनुसूचित क्षेत्रातील काही क्षेत्रे वगळून शासकीय जमिनीवर आढळलेल्या गौण वन उत्पादनावर मालकी विहित स्तरावरील पंचायत आणि ग्रामसभाची असते. ज्यावरील अशी मालकी नसते, ती क्षेत्रे कोणती ? ०३

४. (अ) भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ६७ अनुसार 'संक्षिप्त संपरीक्षण' **(Summary Trial)** यावर संक्षिप्त टिप्पणी लिहा. ०५

(ब) भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ६८ मध्ये अपराधांची तडजोड करण्याबाबत तरतुदी आहेत. या संबंधात खालील प्रश्नांची उत्तरे द्या—

(१) तडजोड न होऊ शकणारे वन अपराध कोणते ? ०१

(२) तडजोड करणाऱ्या अधिकाऱ्याद्वारे संशयित अपराधीकडून अपराधाबद्दल नुकसान भरपाई म्हणून कमाल किती रक्कम स्वीकृत केली जाऊ शकते ? ०२

(३) जेव्हा सरकार जमा होण्यास कोणतीही मालमत्ता जप्त करण्यात आली असेल, तेव्हा मोबदलाच्या रकमेव्यतिरिक्त तडजोड करणारे अधिकारीद्वारे संशयित अपराधीकडून अदा केली जाणारी इतर कोणत्या रकमेबाबत निर्देश दिले जाऊ शकतात. ०१

(४) संशयित अपराधीद्वारे उक्त दोन्ही रक्कम अदा केल्यानंतर काय परिणाम होणार ? ०३

(क) वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अनुसार वन्य प्राण्याची शिकार करणे हा अपराध आहे. तथापि कोणत्या परिस्थितीत वन्य प्राण्यास ठार मारणे किंवा जखमी करणे अपराध ठरणार नाही ? सदरप्रमाणे ठार मारणे किंवा जखमी करणे हे अपराध नाही, या निष्कर्षाप्रत येण्यापूर्वी कोणत्या अटी पूर्ण होणे आवश्यक आहेत ? ठार मारण्यात आलेल्या वन्य प्राण्याचे शरीर कोणाची मालमत्ता राहील ? ०६

(ड) महाराष्ट्र वृक्ष तोड (विनियमन) अधिनियम, १९६४ च्या संदर्भात खालील प्रश्नांची उत्तरे द्या—

(१) सदर अधिनियम कोणत्या क्षेत्रांवर लागू आहे ? ०१

(२) कोणत्या परिस्थितीत वृक्ष अधिकारी हा वृक्षांच्या तोडीसाठी परवानगी नाकारू शकत नाही ? ०१

(३) कोणत्या परिस्थितीत वृक्ष तोडीसाठी मागितलेली परवानगी मानीव ठरते ? ०३

[उलटून पहा

गुण

(४) कलम ३ मधील तरतुदींचे उल्लंघन करून वृक्ष तोड करण्यात आली असल्यास कोणती शिक्षा विहित करण्यात आली आहे ? ०२

(इ) (१) जैव विविधता अधिनियम, २००२ अनुसार 'जैविक संसाधने' (Biological resources) या शब्दाची व्याख्या करा. ०२

(२) जैव विविधता अधिनियम, २००२ अनुसार वाणिज्यिक वापरासाठी, जैविक संसाधने प्राप्त करण्याकरिता भारतीय नागरिकांवर कोणते निर्बंध आहेत ? सदर निर्बंधाचे उल्लंघन होण्याच्या स्थितीत कोणती शिक्षा विहित करण्यात आली आहे ? ०३

५. (अ) वन्यजीव (सरंक्षण) अधिनियम, १९७२ अनुसार वन्य प्राण्याची शिकार करणे अपराध आहे. तथापि—

(१) कोणत्या प्रयोजनार्थ वन्य प्राण्याची शिकार करण्यासाठी परवाना दिला जाऊ शकतो ? ०४

(२) सदर परवाना देण्यासाठी कोणते प्राधिकरण सक्षम आहे ? ०१

(३) वाघ आणि निलगाय या वन्य प्राण्यांच्या बाबतीत असा परवाना प्रदान करण्यापूर्वी ज्यांची पूर्व परवानगी आवश्यक आहे. अशा दोन स्वतंत्र प्राधिकरणाची नावे नमूद करा. ०२

(ब) राखीव वनात अंतर्भूत असलेले एखादे क्षेत्रास अभयारण्य म्हणून घोषित करण्यासाठी कार्यपद्धती लिहा. ०४

(क) मुख्य वन्यजीव रक्षक किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याची पूर्व परवानगीशिवाय अभयारण्यात प्रवेश करण्यास प्रतिबंध आहे. तथापि वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या कलम २७ व २८ मधील तरतुदी विचारात घेता—

(१) अशा परवानगीशिवाय कोणती व्यक्ती अभयारण्यात प्रवेश करू शकते किंवा वास्तव्य करू शकते ? ०४

(२) अभयारण्यात प्रवेश करण्यास किंवा वास्तव्य करण्यास कायदेशीररित्या परवानगी मिळालेल्या व्यक्तीची कर्तव्ये काय असतात ? ०४

(ड) महाराष्ट्र आदिवासी भोगवटदारांची वृक्षांची विक्री (विनियमन) अधिनियम, १९६९ च्या संदर्भात खालील प्रश्नाची उत्तरे द्या —

(१) स्वतःच्या भोगवटदाराखाली असलेल्या वृक्षांची विक्रीकरिता जिल्हाधिकारी यांचेकडून साहाय्य प्राप्त करण्यास कोणत्या श्रेणीतील व्यक्ती पात्र असतात ? ०१

(२) उक्त अधिनियमाच्या कलम ५(५) अनुसार रक्कम अदायगीसाठी काय वेळापत्रक आहे ? ०४

(इ) महाराष्ट्र वन उत्पादन (व्यापाराचे विनियमन) अधिनियम, १९६९ च्या संदर्भात खालील प्रश्नांची उत्तरे द्या—

(१) उक्त अधिनियमात समाविष्ट दोन वन उत्पादनांची नावे लिहा– ०१

(२) राज्य शासन हे कोणाच्या सल्ल्याने वन-उत्पादनाचा खरेदी-दर निश्चित करते. ०१

(३) वन-उत्पादनाचा खरेदी दर निश्चित करताना राज्य शासन कोणत्या मुख्य बाबींवर विचार करतो ? ०४

६ (अ) वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ खाली घडणारे अपराधांबद्दल प्रवेश, शोध, अटक व थांबवून घेणे (detention) साठी सक्षम असणारे प्राधिकरण आणि अधिकारी कोणते ? ०२

(ब) सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेशिवाय वन्य प्राण्याची कातडी ताब्यात असणारा एक व्यक्ती आढळतो आणि तो एका वन अधिकारीद्वारे अटक केला जातो आणि तो सदर कातडीसुद्धा जप्त करतो. आता खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

(१) सदर अटक आणि जप्तीनंतर उक्त वन अधिकाऱ्याची कर्तव्ये कोणती आहेत ? ०३

(२) जर सदर वन अधिकारी उक्तप्रमाणे कर्तव्ये बजाविण्यास अपयशी ठरत असेल तर काय परिणाम होतील ? ०२

(३) सदर प्रकरणी कोणते अधिकारी तपास करतील ? ०१

गुण

(४) तपासात जर जप्त कातडी चितळ या वन्यप्राण्याची असल्याचे निष्पन्न झाल्यास, सदर प्रकरणी तडजोड केली जाऊ शकते किंवा कसे ? कारणे नमूद करा. ०२

(५) जर सदर प्रकरणी तडजोड करण्याचे निर्णय घेण्यात आले तर तडजोडी करण्यासाठी सक्षम असणारे अधिकारी कोणते ? ०१

(६) तडजोडी करणारा अधिकारी अटक केलेल्या व्यक्तीकडून संशयित अपराधाच्या मोबदल्यात रक्कम स्वीकारू शकतो किंवा कसे ? जर प्रश्नाचे उत्तर 'होय' म्हणून असेल, तर कमाल किती रक्कम स्वीकारली जाऊ शकते ? ०२

(७) तडजोड करणारे अधिकारीद्वारे आदेशित केल्याप्रमाणे अटकेत असलेली व्यक्ती जर रक्कम अदा करत असेल तर अदायगीनंतर काय परिणाम होईल ? ०३

(८) तडजोडीच्या ऐवजी जर अटक केलेल्या व्यक्ती विरोधात खटला दाखल करण्याचा निर्णय झाल्यास, न्यायालयात फिर्याद दाखल करण्यासाठी कोण सक्षम राहील ? ०१

(क) अनुसूचित जमाती तथा इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या कलम ३(२) अनुसार कोणत्या परिस्थितीत वन जमिनीचे वलतीकरण अनुज्ञेय आहे ? ज्यासाठी सदर वलतीकरण अनुज्ञेय आहे, अशा कोणत्याही पाच सोयी नमूद करा. ०६

(ड) पंचायतसंबंधी अनुबंध (अनुसूचित क्षेत्रातील विस्तार) अधिनियम, १९९६ [PESA] यातील गौण वन उत्पादनासंबंधी तरतुदी नमूद करा. ०२

(इ) एका राष्ट्रीय उद्यानातील समाविष्ट शासकीय जमीन म्हणून असलेल्या तथापि राष्ट्रीय उद्यान किंवा अभयारण्य म्हणून नसलेले एक क्षेत्र एका व्यक्तीचे अनधिकृत ताब्याखाली आढळते. त्यांनी त्या ठिकाणी काही बांधकामेही उभी केली आहेत.

आता खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

(१) सदर व्यक्तीस निष्कासित करण्यासाठी कोण सक्षम आहे ? ०१

(२) सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यासाठी कोण सक्षम आहे ? ०१

(३) सदर व्यक्तीची औजारे आणि वस्तू सरकार जमा करण्यासाठी आदेश जारी करण्यासाठी कोण सक्षम आहे ? ०१

(४) सरकार जमा करण्यासाठी उक्त आदेश जारी होण्यापूर्वी कोणती औपचारिकता पूर्ण होणे आवश्यक आहे ? ०२

[ उलटून पहा

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## DEPARTMENTAL EXAMINATION FOR FOREST OFFICERS

MUMBAI, SATURDAY, 19TH JANUARY 2019

[TIME—2-30 P.M. TO 5-30 P.M.]

(FULL MARKS—150)

## PAPER II
## FOREST LAW AND INDIAN FOREST ACT, ETC.

*(Without Books)*

*N.B.*— (1) Candidate should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his / her identity anywhere inside the answer book otherwise he / she will be penalized.

(2) Candidates are expected to answer all the sub-questions of a questions together, if sub-questions of a questions is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another questions) the later sub-question shall be overlooked.

(3) Answers are to be written in one language only either in **Marathi** or in **English.**

(4) Quote the relevant Act, Section and Rule, wherever applicable.

(5) Attempt any *five* questions.

**Marks**

1. (*a*) In the Indian Forest Act, 1927, the term 'forest-produce' has been classified in the following two categories, namely :— 5

(*i*) the items whether found in or brought from a forest or not; and

(*ii*) the items when found in or brought from a forest.

Write any *five* items under each category, as stated above.

(*b*) As per section 3 of the Indian Forest Act, 1927, it has been provided that the State Government may constitute certain area as reserved forests.— 5

What are the conditions required under which the State Government may constitute reserved forests ?

(*c*) What powers may be exercised by the Forest Settlement Officer for the purpose of inquiry under chapter II of the Indian Forest Act, 1927 ? 4

(*d*) As per section 20 of the Indian Forest Act, 1927, what formalities must have been completed before the State Government can declare reserved forests ? 5

(*e*) With respect to the Maharashtra Private Forests (Acquisition) Act, 1975, answer the following—

(*i*) Define the term 'private forest'. 5

(*ii*) What provisions stand applicable to private forests with effect on and from the appointed day, as per section 3 ? 3

Marks

(*f*) State the statutory powers, which may be invested with the forest-officers by the State Government under section 72 of the Indian Forest Act, 1927 ? 3

2. (*a*) State any five acts, which may constitute an offence under section 26 of the Indian Forest Act, 1927. 5

(*b*) Under what circumstances, the forest-produce together with other items can be seized under section 52 of the Indian Forest Act, 1927 ? What may be the consequences, in case if such seizure is wrongful ? 7

(*c*) Section 58 of the Indian Forest Act, 1927 has the provision, whereby the property seized under section 52 may be sold. In this context, answer the following questions—

(*i*) Who may sell the seized property ? 2

(*ii*) What are the conditions required to be fulfilled before such property may be sold ? 2

(*iii*) What are the duties which have been imposed on the officer, who has sold such property ? 2

(*d*) Stating the relevant section, answer the following question—

(*i*) Name the officers, who are empowered to make an arrest under the Indian Forest Act, 1927 ? 3

(*ii*) Under what circumstances, such arrest can be made ? 2

(*iii*) Under section 65, who may release the person arrested ? State the procedure also. 4

(*e*) In respect to the Forest (Conservation) Act, 1980, answer the following—

(*i*) Under normal circumstances, whose prior approval is required for the diversion of forest-land for the non-forestry use ? 1

(*ii*) What is the penalty prescribed in case of contravention of the provisions contained in section 2 ? 2

3. (*a*) With respect to the Wild Life (Protection) Act, 1972, Answer the following—

Write short notes, distinguishing the terms—

(*i*) 'Animal', 'Captive animal' and 'Wild animal'. 3

(*ii*) 'Sanctuary', 'National park' and 'Protected area'. 3

(*iii*) Clarify the term 'Hunting'. 3

(*b*) Carefully go through the following situation in a locality and answer the questions based on the provisions contained in the Wild Life (Protection) Act, 1972—

A tiger is being regularly sighted for about two-three months by the villagers in and around the cultivation areas, therein. There is no protected area within at least 100 km. radius of the village. Forests are only in fragmented patches in the entire taluka where village is located. Presently, it is the month of October-November and the *kharif* crops

are ready for the harvest. So far, the said tiger has killed 8-10 cattle in the said village, however it has neither killed any human nor has made any attempt to harm them. The farmers have to go to their fields to take care of the crop, which is to be harvested without any delay. But because of the movement of the tiger, they feel unsafe, particularly during the late evenings and early mornings. Therefore, they approach the local forest-officers, with a representation that the said tiger should be killed. The forest-officers have deployed camera-traps near the cattle kills and the presence of the tiger has been confirmed. There is tremendous pressure on the local forest-officers from the villagers and public representatives to eliminate the tiger.

(*i*) Which Authority is empowered to issue order to capture or kill the tiger ? 1

(*ii*) What are the conditions that must be satisfied before the order for capturing can be issued by the said Authority ? 3

(*iii*) If at all, the said Authority decides to issue orders to kill the tiger, in what regards it has to satisfy itself before issuing such order ? 1

(*iv*) If it is decided by the said Authority to capture the tiger, then whether it be kept in captivity forever ? State the conditions under both the situations. 2

(*v*) Presuming yourself as the competent authority to issue the orders of killing the tiger, write the operative part of your order. (Write the Operative Part only. Do not write your Name in the order.) 3

(*c*) With respect to the Scheduled Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forest Rights) Act, 2006, answer the following—

Give the definition of the terms —

(*i*) forest land 1

(*ii*) minor forest produce 1

(*iii*) other traditional forest dweller. 1

(*d*) State any five forest rights that are admissible under section 3(*1*) of the Scheduled Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forest Rights) Act, 2006. 5

(*e*) As per the Maharashtra Transfer of Ownership of Minor Forest Produce in the Scheduled Areas and the Maharashtra Minor Forest Produce (Regulation of Trade) (Amendment) Act, 1997, the ownership of minor forest produce found in the government lands in the Scheduled Areas vests with the panchayats at appropriate level and the gramsabhas, excluding certain areas. Which are the areas over which such ownership is excluded ? 3

Marks

4. (a) Write a short note on Summary Trial as contained in Section 67 of the Indian Forest Act, 1927. 5

(b) Section 68 of the Indian Forest Act, 1927 contains the provisions regarding compounding of offences. In this context, answer the following questions—

(i) What forest-offences cannot be compounded at all ? 1

(ii) What maximum amount may be accepted by the Compounding Officer as compensation amount from the suspected offender ? 2

(iii) When any property has also been seized as liable to confiscation, then apart from the compensation amount, what other amount of money may be directed by the Compounding Officer, to be paid by the suspected offender ? 1

(iv) What are the consequences, when both such amounts are paid by the suspected offender ? 3

(c) Hunting of wild animal is an offence under the Wild Life (Protection) Act, 1972. However, under what circumstances, killing or wounding of a wild animal shall not be an offence? What are the conditions which must be satisfied to conclude that such killing or wounding is not an offence? Whose property shall be the body of the killed wild animal ? 6

(d) In respect of the Maharashtra Felling of Trees (Regulation) Act, 1964, answer the following—

(i) On which areas, the said Act is applicable ? 1

(ii) Under what circumstances, the permission for felling of trees shall not be refused by the Tree Officer ? 1

(iii) Under what circumstances, the permission applied for felling of trees shall be deemed to have been granted ? 3

(iv) What is the penalty prescribed for felling trees in contravention of the provisions contained in section 3 ? 2

(e) (i) Give definition of the term 'biological resources' under the Biological Diversity Act, 2002. 2

(ii) As per the Biological Diversity Act, 2002, what are the restrictions that have been imposed on Indian citizens for obtaining biological resources for commercial utilization? What penalty is prescribed in case if such restrictions are violated ? 3

5. (a) Hunting of wild animal is an offence under the Wild Life (Protection) Act, 1972.

However—

(i) For what purposes a permit may be granted to hunt a wild animal ? 4

(ii) Which authority is competent to grant such permit ? 1

(iii) Name the two separate authorities whose previous permission shall be required before granting such permit in respect of a tiger and in respect of a Nilgai respectively. 2

Marks

(*b*) Write the procedure to declare any area comprised within a reserved forests as a Sanctuary. 4

(*c*) There are restrictions on entry into a sanctuary without the permission of the Chief Wild Life Warden or the authorized officer. However, taking into consideration the provisions contained in section 27 and 28 of the Wild Life (Protection) Act, 1972—

(*i*) Name the persons, who can enter and reside in a sanctuary without such permission ? 4

(*ii*) What are the duties of a person, who is legally permitted to enter and reside in a sanctuary ? 4

(*d*) In respect of the Maharashtra Sale of Trees by Occupants belonging to Scheduled Tribes (Regulation) Act, 1969, answer the following—

(*i*) What category of persons can seek assistance of collector for sale of trees in their holdings ? 1

(*ii*) What is the payment schedule as per section 5 (5) of the said Act ? 4

(*e*) In respect of the Maharashtra Forest Produce (Regulation of Trade) Act, 1969, answer the following—

(*i*) Name the two forest-produce that are covered at present under the said Act. 1

(*ii*) With whose consultation the State Government fixes the purchase-price of forest-produce ? 1

(*iii*) What are the main factors, which are considered by the State Government while fixing the purchase-price of the forest - produce ? 4

6. (*a*) Name the authorities and officers, who are empowered for entry, search, arrest and detention in respect of the offences committed under the Wild Life (Protection) Act, 1972 ? 2

(*b*) A person, found in possession of a skin of a wild animal without any permission from the competent authority is arrested by a forest-officer, who also seizes the said skin. Now answer the following questions—

(*i*) What are the duties that have been imposed on the said forest-officer, immediately after such seizure and arrest ? 3

(*ii*) What are the consequences, if the said officer fails to perform such duties ? 2

(*iii*) Who shall be the officers to carry out investigation in the said case ? 1

(*iv*) If during the investigation, it is established that the seized skin is of a *chital*, then whether or not the case can be compounded? State the reasons. 2

(*v*) If it is decided to compound the case, then name the officers, who are competent to compound the case ? 1

(*vi*) Can the Compounding Officer accept the money as a composition of the offence suspected to have been committed by the arrested person? If yes, then what maximum amount can be accepted ? 2

Marks

(*vii*) What shall be the natural course, if the arrested person pays the money as ordered by the Compounding Officer ? 3

(*viii*) If instead Compounding, it is decided to prosecute the arrested person, then who shall be the competent to file the complaint before the Court ? 1

(*c*) As per section 3(2) of the Scheduled Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forest Rights) Act, 2006, under what conditions, the diversion of forest-land is admissible? State any five facilities, for which such diversion is admissible. 6

(*d*) State the provisions contained in the Provisions of the Panchayats (Extension to the Scheduled Areas) Act, 1996 in respect to the minor forest produce ? 2

(*e*) A National Park comprising a portion which is a Government land but neither a reserved forest nor protected forest, is found to be unauthorizedly occupied by a person, who has also erected certain structures therein. Now answer the following questions—

(*i*) Who is empowered to evict the said person ? 1

(*ii*) Who is empowered to remove the said unauthorized structures ? 1

(*iii*) Who is empowered to issue orders to confiscate all the tools and things belonging to such person ? 1

(*iv*) What formalities are required to be completed before issuing such orders of confiscation? 2

CON 1021

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## वन अधिकाऱ्यांकरिता विभागीय परीक्षा

मुंबई, रविवार, दिनांक २० जानेवारी २०१९

[ **वेळ** : सकाळी १०-०० ते दुपारी १-०० ]

(**एकूण गुण**–१५०)

**पेपर क्रमांक ३**

**प्रोसिजर आणि अकाऊंट्स**

(पुस्तकांसह)

**सूचना**.—(१) उत्तरपत्रिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

(२) उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्‌नंतर) सोडविल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

(३) प्रश्नांची उत्तरे **मराठी** वा **इंग्रजी** एकाच भाषेत लिहावयाची आहेत.

(४) कोणतेही **पाच** प्रश्न सोडवा. पाच प्रश्नापेक्षा जास्त प्रश्न सोडविल्यास जास्तीच्या प्रश्नांना गुण दिले जाणार नाही.

(५) उत्तराच्या पुष्ट्यर्थ नियमातील तरतुदी आवश्यक असतील तेथे नमूद करा.

(६) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**गुण**

१. (अ) इंग्रजीत संपूर्ण विस्तारित स्वरूपात लिहा :— १०

(१) P.C.C.F (P and M) (२) A.P.C.C.F. (BPD)

(३) P.A.O (४) C.A.M.P.A.

(५) J.M.F.C. (६) D.P.D.C.

(७) F.D.A. (८) M.S.B.B.

(९) M.O.E.F and C.C. (१०) B.D.S.

(ब) खालील अधिकाऱ्यांची कर्तव्ये थोडक्यात विशद करा :— २०

(१) वनपाल (२) वनपरिक्षेत्र अधिकारी

(३) मुख्य वनसंरक्षक (४) प्रशासकीय अधिकारी.

२. थोडक्यात टिप्पणी लिहा (कोणत्याही **पाच**) :— ३०

(अ) वाहन निर्लेखन पद्धती

(ब) काष्ठ लेखा

(क) रोपवन नोंदवही

(ड) मोजमाप पुस्तिका

(इ) गानद वन्यजीव रक्षक

(फ) उप वनसंरक्षकांचे स्थापत्य कामाचे तांत्रिक अधिकार.

३. मुख्य वनसंरक्षक पदाचे स्थापत्य विषयक तांत्रिक, प्रशासकीय मंजुरी संबंधात, आस्थापना विषयासंबंधात, वनगुन्हे संबंधात प्रदान अधिकारांबाबत माहिती सविस्तरपणे द्या. ३०

[ उलटून पहा

गुण

४. मोटारवाहन अग्रिम, घरबांधणी अग्रिम, संगणक अग्रिम, सायकल अग्रिम याबाबत तरतुदी व मर्यादा वर्णन करा. ३०

५. (अ) शासकीय सेवेतून निवृत्तीचे विविध प्रकार सांगून निवृत्तीनंतर विविध देय लाभांची माहिती द्या. १५

(ब) शासकीय कर्मचाऱ्यांचे निलंबन याविषयी तरतुदी लिहा. १५

६. फरक स्पष्ट करा :– ३०

(अ) राष्ट्रीय उद्यान व वन उद्यान

(ब) राखीव वन व ग्राम वन

(क) साठा चित्र नकाशा व उपचार नकाशा

(ड) सेवेतून बडतर्फ करणे व सेवेतून काढून टाकणे

(इ) वन संरक्षण व वन संवर्धन.

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## DEPARTMENTAL EXAMINATION FOR FOREST OFFICERS

MUMBAI, SUNDAY, 20TH January 2019

[TIME—10-00 A.M. TO 1-00 P.M.]

(FULL MARKS—150)

## PAPER III

## PROCEDURE AND ACCOUNTS

*(With Books)*

*N.B.*—(1) Candidate should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answer book otherwise he/she will be penalised.

(2) Candidates are expected to answer all the sub-questions of a question together, if sub-question of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later sub-question shall be overlooked.

(3) Answers are to be written in one language only, either in *Marathi* or in *English*.

(4) Answer any *five* questions. Answers of more than five question will be ignored for assessment.

(5) Quote relevant provisions wherever necessary in support of answers.

(6) All questions carry equal marks.

**Marks**

1. (*a*) Write full forms of the following :— 10

| | | | |
|---|---|---|---|
| (*i*) | P.C.C.F (P and M) | (*ii*) | A.P.C.C.F. (BPD) |
| (*iii*) | P.A.O | (*iv*) | C.A.M.P.A. |
| (*v*) | J.M.F.C. | (*vi*) | D.P.D.C. |
| (*vii*) | F.D.A. | (*viii*) | M.S.B.B. |
| (*ix*) | M.O.E.F and C.C. | (*x*) | B.D.S. |

(*b*) Describe the duties of the following officers in brief :— 20

(*i*) Forester

(*ii*) Range Forest Officer

(*iii*) Chief Conservator of forests

(*iv*) Administrative Officer.

2. Write short note (any *five*) :— 30

(*a*) Procedure for write-off of vehicles

(*b*) Timber Account

(*c*) Plantation register

(*d*) Measurement book

(*e*) Honorary wild life warden

(*f*) Powers of Dy. C. F. in relation to T. S. for Civil works.

[ *Turn Over*

Marks

3. Give detailed description of powers delegated to Chief Conservator of forests in relation to technical sanction and administrative approval of civil works, establishment matters, forest offences. 30

4. Describe the provisions and financial limits in respect of motor vehicle advance, house building advance, computer advance and cycle advance. 30

5. (*a*) Give detailed information about the various types of retirement from service and list the entitlements of superannuation. 15

(*b*) Provisions related to suspension of a Government Servant. 15

6. Distinguish between the following :— 30

(*a*) National Park and Forest Park.

(*b*) Reserved Forest and Village Forest.

(*c*) Stock Map and Treatment Map.

(*d*) Removal and Dismissal from service.

(*e*) Forest Protection and Forest Conservation.